2 7 SEP 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘महाराणी जिजाबाई कोल्हापूरच्या रक्षणकर्त्या पुस्तक मार्गदर्शक’

प्रतिनिधी
कोल्हापूर

छत्रपती ताराराणी यांनी कोल्हापूर संस्थानाची स्थापना केली. त्यांच्यानंतर कोल्हापूर राज्याचे संरक्षण करण्याची जबाबदारी त्यांच्या स्नुषा छत्रपती जिजाबाईनी पार पाडली. त्यांनी केलेले कार्य आजही दुर्लक्षित आहे, आता ‘महाराणी जिजाबाई: कोल्हापूर राज्याच्या रक्षणकर्त्या’ या पुस्तकातून त्यांच्या कार्याची ओळख सर्वांना होईल, असे प्रतिपादन संयोगिताराजे छत्रपती यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात डॉ. विजयाराणी पाटील लिखित ‘महाराणी जिजाबाई : कोल्हापूर राज्याच्या रक्षणकर्त्या’



पुसतक प्रकाशन करताना संयोगिताराजे छत्रपती. सोबत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. रमेश जाधव, डॉ. भारती पाटील, डॉ. विजयाराणी पाटील.

या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा संयोगिताराजे छत्रपती यांच्या हस्ते वस्तू संग्रहालयात झाला. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील होते.

लेखिका डॉ. विजयाराणी पाटील यांनी पुस्तकाबद्दल माहिती दिली. कै. शारदाबाई पवार अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी पुस्तक प्रकाशनामागील भुमिका स्पष्ट केली. जेष्ठ इतिहास संशोधक डॉ. रमेश जाधव यांनी लेखिकीने पुस्तक प्रकाशित करुन करवीर संस्थांनाच्या इतिहासात मोलाची भर घातली आहे. असे सांगितले.

अध्यक्षस्थानावरून बोलताना प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, या संशोधनाचे इंग्रजी आणि इतर भाषामध्ये भाषांतर झाल्यास छत्रपती जिजाबाईचे कार्यकर्तृत्व सर्वदूर पोहोचेल. सुष्मिता खुटाळे यांनी सुत्रसंचालन केले. प्रा. नेहा वाडेकर यांनी आभार मानले. यावेळी डॉ. जयसिंगराव पवार, सुनीलकुमार लवटे, डॉ. एस. एन. पवार, आदी उपस्थित होते.

महासत्ता



कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पारितोषिक स्वीकारताना डॉ. सौ. सुषमा कुलकर्णी, डॉ.सौ. मनीषा जगताप.

# नियतकालिका स्पर्धेत आरआयटी महाविद्यालयाचा द्वितीय क्रमांक

इस्लामपूर,ता. २६(प्रतिनिधी)-

..............................

**इस्लामपूर येथील राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (आरआयटी) या स्वायत्त महाविद्यालयाच्या विश्वकर्मा या वार्षिक नियतकालिकास शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयीन नियतकालिका स्पर्धेमध्ये व्यावसायिक महाविद्यालय गटामध्ये द्वितीय क्रमांकाचे सर्वसाधारण विजेतेपद प्राप्त झाले.**

याप्रसंगी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठाचे प्रो. कुलगुरू डॉ.पी.एस.पाटील यांच्या हस्ते आणि रजिस्ट्रार डॉ.व्ही.एन.शिंदे आणि डेप्युटी रेजिस्ट्रार पी.एस. पांडव यांच्या उपस्थितीत महाविद्यालयाच्या संचालिका डॉ सौ.सुषमा कुलकर्णी आणि डॉ.सौ.मनीषा जगताप यांचा सत्कार करण्यात आला व महाविद्यालयास फिरते चषक प्रदान करण्यात आले.

महासत्ता

# शिवाजी विद्यापीठात पंडित दीनदयाळ उपाध्याय जयंती

कोल्हापूर, ता. २६ (प्रतिनिधी) -

शिवाजी विद्यापीठात पंडित दिनदयाळ उपाध्याय यांची जयंती तथा अंत्योदय दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

विद्यापीठातील मुख्य प्रशासकीय भवनात पंडित दिनदयाळ उपाध्याय यांच्या प्रतिमेस प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. पी. एन. वासंबेकर यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय सेवक आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

लोकमत

# इतिहास प्रमेयेचे रविवारी प्रकाशन

कोल्हापूर : प्रा. गौतमीपुत्र कांबळे संपादित 'फुले-आंबेडकरी इतिहास प्रमेये' या पुस्तकाचे प्रकाशन रविवारी (दि. २) सकाळी ११ वाजता शाहू स्मारक भवनात होणार आहे. यावेळी शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे इतिहास विभागप्रमुख डॉ. उमेश बगाडे उपस्थित असतील.

महाराष्ट्र टाइम्स

# डॉ.शिवाजी जाधव समन्वयकपदी नियुक्ती

कोल्हापूर, ता.२६ (प्रतिनिधी)-

.................................

शिवाजी विद्यापीठाच्या एम. ए. मास कम्युनिकेशन विभागाच्या समन्वयकपदी पत्रकारिता व जनसंवाद अधिविभागातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. शिवाजी जाधव यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

डॉ.जाधव यांना विद्यापीठ प्रशासनाकडून नियुक्तीचे पत्र देण्यात आले. तसेच डॉ.जाधव यांना पत्रकारिता व जनसंवाद विषयातील पीएचडी मार्गदर्शक म्हणून मान्यता मिळाली आहे. पद्मश्री डॉ.ग. गो.जाधव पत्रकारिता अध्यासनाचेही ते समन्वयक आहेत.

27 SEP 2022 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ निवडणूक; १ ऑक्टोबरला दुरुस्त मतदारयादी जाहीर होणार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ निवडणूक प्रक्रिया सुरू आहे. तात्पुरत्या मतदार यादीमध्ये वगळलेल्या किंवा चुकीच्या कोणत्याही नोंदीबाबत कुलसचिवांकडे बऱ्याच मतदारांनी आक्षेप नोंदवला. त्यामुळे शासकीय सुट्टी असूनही निवडणूक आणि आवक-जावक विभाग सुरू होता. तक्रार अर्जांची पडताळणी, योग्य दुरुस्त्या करून १ ऑक्टोबर रोजी दुरुस्त मतदार यादी जाहीर होईल.

विद्यापीठास शासकीय सुट्टी असली तरीही निवडणूक विभागाने मतदारांच्या दुरुस्त्या अर्ज स्वीकारले.



विविध पदांसाठी १४ नोव्हेंबर २०२२ रोजी प्रत्यक्ष मतदान होणार आहे. १ ऑक्टोबरला दुरुस्त मतदार यादी जाहीर होईल. ६ ऑक्टोबर सायंकाळी ५ वाजेपर्यंत दुरुस्त मतदार यादीसंदर्भात काही आक्षेप असल्यास कुलगुरूंकडे तक्रार करता येणार आहे. १२ ऑक्टोबर रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होईल. १४ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत प्रत्यक्ष मतदान होईल. १६ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजल्यापासून मतमोजणीला सुरुवात होणार असून निकाल जाहीर होईल.

विद्यापीठ निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्याने सर्व विद्यार्थी, प्राध्यापक संघटनांसह विद्यापीठ विकास आघाडी व विद्यापीठ विकास मंचने रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे. सुटा आणि शिवाजी विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी संघटना मतदारांपर्यंत पोहोचत आहेत. प्रत्यक्ष मतदान दीड महिन्यानंतर होणार असले तरी निवडणूक प्रचार सुरू झाला आहे.

27 SEP 2022
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



विज्ञानाच्या विश्वात

डॉ. व्ही.एन. शिंदे

# जडत्व : दगडाचे अन् माणसाचे!

सतराव्या शतकात न्यूटनने लावलेला गुरुत्वाकर्षणाचा शोध सर्वांच्या लक्षात असतो, तो त्याच्याशी जोडलेल्या सफरचंदाच्या कथेमुळे. न्यूटनने लावलेला तो एकमेव शोध नाही. न्यूटनने सैद्धांतिक भौतिकी आणि प्रायोगिक भौतिकीमध्ये तितक्याच ताकतीने मुशाफिरी केली. महत्त्वाचे शोध लावले. न्यूटनने मांडलेल्या गतीच्या नियमांमुळेच औद्योगिक प्रगतीला गती मिळाली, हे मान्य करावेच लागेल. न्यूटनने गतीचे तीन नियम मांडले. ते सार्वकालिक आहेत; मात्र ते पदार्थांसाठी, सर्वसाधारण वेगासाठी लागू पडतात. म्हणजेच ज्या घटनांचा संबंध सर्वसामान्यांचा येतो. प्रकाशाच्या वेगाइतका किंवा त्यापेक्षा जास्त वेग असलेल्या वस्तू किंवा कणांचा संबंध भौतिकीतील संशोधकापर्यंत मर्यादित असतो. त्यामुळे सामान्य मानवाच्या गरजेचे किंवा त्याला अनुभवता येतील, असे न्यूटनचे तीन नियम महत्त्वाचे ठरतात.

त्यापूर्वी पाश्चात्य राष्ट्रात पदार्थांच्या गतीसंदर्भात ॲरिस्टॉटल यांचे मत गृहीत धरत असत. ॲरिस्टॉटल यांच्या मते 'जड वस्तूंना किंवा पदार्थांना स्थिर राहायला आवडते. त्याचवेळी धुरासारख्या हलक्या वस्तू अवकाशात जातात आणि स्थिर राहतात. अंतराळात असणाऱ्या तारकांना अवकाशातच राहायला आवडते. प्रत्येक पदार्थाची स्थिती ही स्थिर स्थिती असते. पदार्थाला सरळ रेषेत जाण्यासाठी कोणाच्या तरी आधाराची गरज असते.' अशा भन्नाट विचारावर न्यूटनच्या गतीविषयक नियमांच्या मांडणीपर्यंत पाश्चात्य राष्ट्रे विश्वास ठेवत होती. दुसरीकडे पूर्वेकडील राष्ट्रे आध्यात्मिक उन्नतीपर्यंत पोहोचली होती. मनाच्या गतीची मांडणी केली गेली होती. मात्र, पदार्थांच्या गतीविषयक नियमांची मांडणी आढळत नाही.

न्यूटनने गतीविषयक नियमांची मांडणी केल्यानंतर पदार्थांची गती समजून घेणे सोपे झाले. त्यावर आधारित उपकरणांची आणि वाहनांची निर्मिती झाली. यातील तिसरा नियम सर्वसामान्यांच्या लक्षात राहतो. विश्वातील सर्व बले अन्योन्यक्रियेच्या स्वरूपात आढळतात. एखाद्या वस्तूवर बल क्रिया करत असेल तर त्या बलाला तितकाच विरोध करणारे बल कार्यान्वित असते. यानुसार एकदिशीय बल कधीच कार्यान्वित नसते. म्हणजेच निसर्गामध्ये कोणताही भौतिक बदल, विरोधाशिवाय होत नाही. न्यूटनने मांडलेला दुसरा नियम वस्तूवर कार्य करत असणाऱ्या सदिश बलांची बेरीज, त्या वस्तूंचे वस्तुमान आणि त्या वस्तूचे त्वरण यांच्या गुणाकाराइतके असते असे सांगतो. एखाद्या गतीप्राप्त वस्तूला, गती देणारे बल किती आहे, हे या नियमाच्या आधारे काढता येते. न्यूटनचा गतीविषयक पहिला नियम हा जडत्वाचा नियम म्हणूनही ओळखला जातो. एखादी वस्तू संतुलित बले कार्यान्वित असताना स्थिर असते. जडत्वीय संदर्भचौकटीतून पाहिल्यास प्रत्येक वस्तू, तिच्यावर कोणतेही बाह्य बल कार्यान्वित नसेल तर स्थिर राहते किंवा स्थिर गतीने मार्गक्रमण करते.

प्रत्यक्ष जीवनात या नियमाची आपण वारंवार अनुभुती घेतो. बसमधून प्रवास करताना चालकाने अचानक ब्रेक दाबला तर आपण पुढे ढकलले जातो. वाहन कोणतेही असले तरी हा अनुभव प्रत्येकाने घेतलेला असतो. रस्त्यावरून गाडी जाताना अचानक वळण आले, तर आपण वळणाच्या विरुद्ध दिशेला ढकलले जातो. हे दोन्ही अनुभव न्यूटनच्या गतीविषयक पहिल्या नियमानुसार घडत असते. आपण कोणत्याही वाहनातून प्रवास करताना आपल्या शरीराने गती पकडलेली असते. मानवी शरीर गतीमध्ये असताना अचानक लावलेला ब्रेक वाहनाची गती कमी करतो. ब्रेक शरीराची गती कमी करू शकत नाही. त्यामुळे वाहनाची गती कमी करण्यासाठी ब्रेक लावला की वाहन थांबते. मात्र, शरीर त्याच गतीने पुढे जात असते. कोणत्याही वाहनाने गती पकडलेली असते, तेव्हा यंत्राने निर्माण केलेली शक्ती कार्य करत असते. वाहनाला गती देण्यासाठी जे बल कार्यान्वित असते, त्याला विरोध करण्याचे कार्य, वाहनामध्ये भरलेले साहित्य, प्रवाशांचे वजन करत असते. जमिनीसोबत टायरचे घर्षण होत असते. त्यातून रस्ताही वाहनाच्या गतीला विरोध करत असतो. वातावरणातील हवाही विरोध करते. मात्र, यंत्राने तयार केलेली शक्ती सर्व विरोधी बलांपेक्षा जास्त असेल, तरच गाडी गती पकडते. अशा बलाची मात्रा जोपर्यंत वाहनाला मिळते, तोपर्यंत वाहन पळते. बल कमी झाले की वाहन थांबते.

वाहनाच्या पदार्थांच्या गतीला लागू असणारा न्यूटनचा तिसरा नियम मानवी देहालाही लागू पडतो. जडत्वाच्या सिद्धांतानुसार, सर्व पदार्थांना स्थिर राहायला आवडते. म्हणूनच मानवी देहाला लोळत ठेवायला आवडते. जडत्वामध्ये पदार्थाचे किंवा वस्तूचे 'वस्तुमान केंद्र' किंवा 'सेंटर ऑफ मास' हे महत्त्वाचे असते. निसर्गातील सर्व वस्तुमान असणाऱ्या चल, अचल, सजीव, निर्जीवास एक वस्तुमान केंद्र असते. तो एक बिंदू असतो. तो बिंदू आणि जमीन यांच्यातील अंतर जितके जास्त असेल तितकी पदार्थाकडे किंवा देहाकडे स्थितीज ऊर्जा जास्त असते. स्थितीज ऊर्जा जास्त असणारा प्रत्येक पदार्थ, किमान स्थितीज ऊर्जावस्था प्राप्त करण्याचा प्रयत्न करतो.

माणूस जेव्हा उभा असतो, तेव्हा त्याच्या शरीराच्या वस्तुमानाचे केंद्र जमिनीपासून दूर असते. त्यामुळे शरीराची स्थितीज ऊर्जा जास्त असते. ही अवस्था अस्थिर असते. थोडा वेळ उभे राहिल्यानंतर बसावेसे वाटते. खुर्चीत बसलेल्या व्यक्तीच्या देहाचे वस्तुमानाचे केंद्र हे जमिनीपासून तसे दूरच असते. देहाची स्थितीज ऊर्जा किमान अवस्थेला पोहोचलेली नसते. त्यामुळे खूप वेळ बसून राहिल्यानंतर थकवा येतो आणि शरीर पसरून लोळावेसे वाटते. ज्यावेळी मानवी देह जमिनीला समांतर पसरलेला असतो, तेव्हा देहाने किमान स्थितीज ऊर्जा धारण केलेली असते. त्यामुळे मानवाला अशा अवस्थेत लोळत राहावेसे वाटते. या अवस्थेतून बाहेर काढायचे काम मन करते. मनस्वी इच्छा देहाप्रकृतीवर असंतुलित बल म्हणून कार्य करते. मनाने एखादे कार्य करण्याचे निश्चित केलेले असेल, तर माणूस उठून काम करतो, नाही तर लोळत पडतो. लोळत राहणारा माणूस आणि दगडाची कृती समान ठरते.

संपर्क : ९६७३७८४४००
vilasshindevs44@gmail.com

जनसंपर्क कक्ष
2 7 SEP 2022 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धेचे शिवाजी विद्यापीठाला यजमानपद

सकाळ वृत्तसेवा

गडहिंग्लज, ता. २६ : भारतीय विद्यापीठ संघटनेतर्फे यंदा होणाऱ्या आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धांचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यात शिवाजी विद्यापीठात पुरुष गटाच्या कुस्ती स्पर्धा रंगणार आहेत. स्पर्धेच्या निमित्ताने कोल्हापुरी कुस्तीचा बाज देशातील मल्लांना अनुभवता येणार आहे. महिला गटाच्या स्पर्धा याचवेळी सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठात होतील. मुंबईत स्वँक्श, तर गडचिरोलीत प्रदर्शनीय वुडबॉल स्पर्धा जाहीर झाल्या आहेत. या वर्षी वुडबॉल, सिक्स ए साईड क्रिकेट या दोन नव्या स्पर्धा प्रदर्शनीय स्तरावर होणार आहेत.



दरवर्षी विद्यापीठ स्तरावरील खेळाडूंना त्यांची गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी आंतर विद्यापीठ स्पर्धा होतात. विभागीय, आंतरविभागीय अखिल भारतीय स्तरावर या स्पर्धा होतात. पन्नासहुन अधिक क्रीडाप्रकार यात आहेत. गेली दोन वर्षे कोरोनामुळे स्पर्धा झाल्या नाहीत. केंद्र शासनाच्या पुढाकाराने विद्यापीठ स्तरावरील खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे, यासाठी दोन वर्षापासून आता खेलो इंडिया स्पर्धाही सुरू झाली आहे. त्यातील यशस्वी खेळाडूंनी शिष्यवृत्ती दिली जाते. कोल्हापूरला कुस्ती परंपरा आहे. या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाला कुस्तीच्या संयोजनाचा मान मिळाला आहे. जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यात स्पर्धा आहेत. देशातील विद्यापीठस्तरावरील प्रतिभावान मल्ल यात सहभागी होतील.

2 7 SEP 2022 तरूण भारत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# दुरूस्त मतदारयादी १ ऑक्टोबरला जाहीर

## शिवाजी विद्यापीठ मतदारांच्या तक्रार अर्जांची मुदत संपली : सुट्टीदिवशीही विभाग सुरू

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ निवडणूक प्रक्रिया पदवीधर मतदार नोंदणीपासून सुरू झाली. १४ नोव्हेंबर २०२२ रोजी प्रत्यक्ष मतदान होईल. २१ सप्टेंबर तात्पुरती मतदार यादी प्रसिध्द झाली. तर २६ सप्टेंबरपर्यंत तात्पुरत्या मतदारयादीमध्ये वगळलेल्या किंवा चुकीच्या कोणत्याही नोंदीबाबत कुलसचिवांकडे बऱ्याच मतदारांनी आक्षेप नोंदवला. त्यामुळे शनिवार, रविवार आणि सोमवारी तीन दिवस शासकीय सुट्टी असूनही निवडणूक आणि आवक-जावक विभाग सुरू होता. सोमवारपर्यंत आलेल्या तक्रार अर्जांची पडताळणी आणि योग्य दुरूस्त्या करून १ ऑक्टोबर रोजी दुरूस्त मतदार यादी जाहीर होईल.

सोमवारी शासकीय सुट्टी होती तरीही निवडणूक विभागाने मतदारांच्या दुरूस्त्या व आक्षेप अर्ज स्वीकारले.



शिवाजी विद्यापीठातील विविध पदांसाठी १४ नोव्हेंबर रोजी प्रत्यक्ष मतदान होणार आहे. यामध्ये विद्यापीठातील दहा प्राचार्य, सहा व्यवस्थापन प्रतिनिधी, दहा महाविद्यालयीन प्राध्यापक, तीन विद्यापीठ प्राध्यापक आणि दहा नोंदणीकृत पदवीधर अधिसभा सदस्य, विद्यापीठ व महाविद्यालयीन प्राध्यापकांमधून आठ प्राध्यापक विद्यापरिषदेवर, ४० सदस्य अभ्यासमंडळावर तीन महाविद्यालयीन विभागप्रमुख या पदांचा समावेश आहे. गेल्या चार दिवसापासून प्राप्त दुरूस्ती अर्जांची तपासणी करून १ ऑक्टोबरला दुरूस्त मतदारयादी जाहीर होईल. ६ ऑक्टोबर सायंकाळी ५ वाजेपर्यंत दुरूस्त मतदारयादीसंदर्भात काही आक्षेप असल्यास कुलगुरूंकडे तक्रार करायची आहे. १२ ऑक्टोबर रोजी अंतिम मतदारयादी प्रसिध्द होईल. १४ ऑक्टोबरला निवडणूक सूचना प्रसिद्ध होईल. ३१ ऑक्टोबरला उमेदवारी अर्जांची छाननी करून वैध, अवैध उमेदवारी अर्ज जाहीर होतील. १ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घ्यावयाचे आहेत. २ नोव्हेंबर सायंकाळी ५ वाजेपर्यंत उमेदवारी अर्जांच्या वैधतेबाबत कुलगुरूंकडे तक्रार करावी. ३ नोव्हेंबर रोजी अंतिम पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द होईल. १४ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत प्रत्यक्ष मतदान होईल. १६ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजल्यापासून मतमोजणीला सुरूवात होणार असून निकाल जाहीर होईल.

निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्याने सर्व विद्यार्थी, प्राध्यापक संघटना मतदारांच्या संपर्कात आहेत. यामध्ये विद्यापीठ विकास आघाडी व विद्यापीठ विकास मंचने प्रचारात आघाडी घेतली आहे. तरीही निवडणुकीमध्ये दोन्ही संघटना एकत्र येत विद्यापीठ विकास आघाडी अंतर्गत निवडणूक लढवण्याची शक्यता नाकारता येत नाही. दुसरीकडे सुटा आणि शिवाजी विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी संघटनेनेही आपल्या परीने मतदारांपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न करीत आहेत. प्रत्यक्ष मतदान दीड महिन्यानंतर असले तरी प्रचारात संघटनांमध्ये चुरस पाहायला मिळतेय.